# अमरावती पॉवर ट्रान्समिशन कंपनी लिमिटेड


**५ वा मजला, टॉवर - बी, वर्ल्ड, मार्क - ९, एरोसिटी, नवी दिल्ली - ११००३६.**

**वेबसाईट: www.rattanindia.com**

**CIN : U45207DL2008PLC180614**


## सार्वजनिक सुचना

**(२०२० चा प्रकरण क्रमांक १३९)**

**अमरावती पॉवर ट्रान्समिशन कंपनीच्या भागधारकरचनेतील (पॅटर्न मधील) बद्दलांसाठीच्या याचिकेवर सुचना/हरकती मागविण्यासाठी**

१. अमरावती पॉवर ट्रान्समिशन कंपनी लिमिटेड (एपीटीसीएल) यांनी, मा. महाराष्ट्र वीज नियामक आयोग यांच्यापुढे, पारेषण परवाना क्रं. ३/२०१० अनुभाग ५.२ (सी) मा. आयोग यांच्या आदेश दिनांक ३० डिसेंबर, २०१० च्या आदेश यांच्या अंतर्गत, कंपनीच्या भागधारक रचनेतील (पॅटर्न मधील) प्रस्तावित बदलांची नोंद घेण्याची प्रार्थना करण्यासाठी याचिका दाखल केली आहे.

२. मा. आयोगाने एपीटीसीएल यांना, या सूचनेद्वारे जनतेकडून सूचना / आक्षेप मागवणारी एक सार्वजनिक सूचना प्रकाशित करण्याचे निर्देश दिले आहेत.

३. याचिकेची ठळक वैशिष्टये :

अ) रतनइंडिया पॉवर लिमिटेड ही कंपनी कलम १९५६ च्या अंतर्गत समाविष्ट केलेली कंपनी आहे आणि कोळशावर आधारित औष्णिक उर्जा प्रकल्प विकसित करण्याच्या व्यवसाय आहे. रतनइंडिया पॉवर लिमिटेड ने एपीटीसीएलची १००% भागीदारी दिनांक २३ ऑक्टोबर, २०१८ रोजी रतनइंडिया सोलर प्राइवेट लिमिटेड यांना हस्तांतरित केली. त्यानंतर, रतनइंडिया सोलर प्राइवेट लिमिटेड ने एपीटीसीएलची १००% भागीदारी दिनांक २५ जून २०१९ रोजी कंपनी कलम १९५६ च्या अंतर्गत समाविष्ट असलेल्या नेटल कन्स्ट्रक्शन प्राइवेट लिमिटेड यांना हस्तांतरित केली.

ब) नेटल कन्स्ट्रक्शन प्राइवेट लिमिटेड कडे एपीटीसीएलची १००% भागीदारी राहील आणि व्यवस्थापकीय नियंत्रण देखील त्यांच्याचकडे राहील. आयोगाने पारित केलेला पारेषण परवाना हा एपीटीसीएलच्या नावे राहील.

क) प्रस्तावित व्यवहारामुळे वीजदरावर कोणताही विपरीत प्रभाव पडणार नाही, कारण वीजदर हा नियमित लेखा पुस्तकांच्या आधारे ठरवणे चालू राहील.

४. याचिकेची प्रत परिशिष्ट/अतिरिक्त माहितीसह लेखी विनंतीवरून एपीटीसीएलच्या कार्यालयातून प्राप्त केली जाऊ शकते.

अ) तपशीलवार याचिका दस्ताऐवज (इंग्रजीमध्ये) रोख किंवा "अमरावती पॉवर ट्रान्समिशन कंपनी लिमिटेड" यांच्या नावे, नवी दिल्ली येथे देय डीडी / धनादेशकरवी रु. १००/- चा भरणा केल्यावर.

| कार्यालय | पत्ता | टेली/फॅक्स क्रमांक | ईमेल |
|---|---|---|---|
| सांघिक कार्यालय | ५ वा मजला, टॉवर - बी, वर्ल्ड, मार्क - १, एरोसिटी, नवी दिल्ली - ११००३७. | टेली: ०११-६६६१२६६६<br>फॅक्स: ०११-६६६१२७७७ | sandeep.agarwal@rattanindia.com;<br>harshad.gavkar@rattanindia.com; |
| साइट कार्यालय | प्लॉट नं.डी- २ आणि डी- २ (भाग), एडिशनल इंडस्ट्रियल एरिया, नांदगांव पेठ, अमरावती, महाराष्ट्र- ४४४९०१ | टेली: ०७२१-३९८२५९३<br>फॅक्स: ०७२१-३९८२५०२ | rajiv.nimje@rattanindia.com |

५. वरील याचिकेवर सूचना / आक्षेप असल्यास, सुचना जाहीर झाल्यापासून २१ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात, संदीप अगरवाल, वरिष्ठ व्यवस्थापक, अमरावती पॉवर ट्रान्समिशन कंपनी लिमिटेड, ५ वा मजला, टॉवर - बी, वर्ल्ड, मार्क - 1, एरोसिटी, नवी दिल्ली - ११००३७. (फॅक्स: ०११-६६६१२७७७, ई-मेल : sandeep.agarwal@rattanindia.com; harshad.gavkar@rattanindia.com) यांना पाठविलेल्या पुराव्यासह **सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, केंद्र क्र. १, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई -४०० ००५ यांना इलेक्ट्रॉनिक माध्यम ehearing@merc.gov.in / secretary@merc.gov.in ई-मेलद्वारे पाठवाव्यात.**

६. सूचना / आक्षेप नोंदवण्यास इच्छुक प्रत्येक व्यक्तिने त्या इंग्रजी किंवा मराठीतून, लेखी स्वरूपात इलेक्ट्रॉनिक माध्यमद्वारे (ई-मेल) आणि पाठवणाऱ्याचे संपूर्ण नाव, टपालाचा पत्ता आणि ई-मेल पत्ता, असल्यास, यांचा उल्लेख करावा. या सूचना / आक्षेप कोणत्याही संस्थेच्या किंवा ग्राहकवर्गाच्या वतीने दाखल करण्यात येत असतील, तर तसेही सूचित करावे. पाठविणाऱ्या व्यक्तिला त्याचे म्हणने ई-सुनावणीमध्ये व्यक्तिशा आयोगासमारे मांडावयाचे असल्यास सुचना / हरकती दाखल करतांना तसे विशेषत्वाने नमुद करावे. अशा प्रकरणी, वैद्य ई-मेल आयडी आणि मोबाईल क्रमांक देणे. आयोग आपल्या स्वेच्छानिर्णयानुसार अशा प्रेषक / आक्षेपकाला ई-सुनावणीमध्ये त्याचे म्हणने मांडण्याची परवानगी देईल. ई-सुनावणीमध्ये भाग घेणारे सर्व उपस्थित आयोगाने व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे जाहीर सुनावणीत हजर राहण्यासाठी दि.१७ सप्टेंबर २०२० रोजी अधिसुचित केलेल्या मार्गदर्शक सुचनांमधील तरतूदीचे अनुसरण करतील (आयोगाच्या संकेतस्थळावर **www.merc.gov.in** येथे उपलब्ध आहे).

७. दि. ९ फेब्रुवारी २०२१ रोजी १०.३० वाजता व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे ई-सार्वजनिक सुनावणी घेतली जाईल. त्यासाठी वेगळी सुचना दिली जाणार नाही.

८. प्रत्येक प्राप्त सूचना / आक्षेपांना एपीटीसीएल, ते प्राप्त झाल्याच्या तीन दिवसांत उत्तर देतील. दि. ०१ फेब्रुवारी, २०२१ पर्यंत प्राप्त झालेल्या सर्व सूचना / आक्षेपांना दि. ४ फेबुवारी, २०२१ पर्यंत उत्तर दिले जाईल. एपीटीसीएल यांनी दिलेल्या उत्तरांना भागधारक सार्वजनिक सुनावणीच्या वेळी किंवा उशीरात उशीरा, दि. १० फेब्रुवारी २०२१ पर्यंत प्रत्युत्तर सादर करु शकतील.

९. याचिका परिशिष्ट / अतिरिक्त माहितीसह एपीटीसीएल यांच्या संकेतस्थळावर **www.rattanindia.com** येथे डाऊनलोड स्वरूपात उपलब्ध आहेत.

स्थान: मुंबई
दिनांक: ११ जानेवारी २०२१

**संदीप अगरवाल**
वरिष्ठ व्यवस्थापक
अमरावती पॉवर ट्रान्समिशन कंपनी लिमिटेड